# नगर परिषद कार्यालय, घाटंजी जि. यवतमाळ

## शुद्धीपत्रक

नगर परिषद घाटंजीच्या मालकीच्या गाळयांच्या ई-लिलावाबाबत दि.२६/०८/२०२६ रोजी सिटी न्यूज या वर्तमानपत्रामध्ये तसेच ई-लिलाव पोर्टलवर जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. सदर ई-लिलावाच्या जाहिरातीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्यापारी संकुल ब्लॉक H मधील गाळा क्र.२१ दिव्यांग करिता तसेच गाळा क्र.२४ भटक्या जमाती प्रवर्गासाठी(NT) करिता आरक्षित असलेले गाळे तांत्रिक अडचणीमुळे दिनांक दि.२५/०८/२०२६ रोजी नियोजित करण्यात आलेला गाळा क्र.२१ व गाळा क्र. २४ चा ई-लिलाव रद्द करण्यात येत आहे. तसेच सुधारित ई-लिलावाची जाहिरात विवरण खालीलप्रमाणे.

| गाळा क्र. | गाळा प्रकार | गाळयाचे क्षेत्रफळ चौ.मी. | गाळे निविदा फी रक्कम रु. | गाळे बोली अनामत रक्कम रु. | त्रिसदस्यीय समितीने निश्चित केलेले प्रतिमाह भाडे बोली रक्कम रु. | स्थायी निर्देश २४ नुसार १०% कमी करून निश्चित झालेली भाडे बोली रक्कम रु | बोलीची पट रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| गाळा क्र.२१ | दिव्यांग (आरक्षित) | ९.४८५ | ५०० | २५,००० | ४१०७/- | ३६३६ | १०० |
| गाळा क्र.२४ | भटक्या जमाती (आरक्षित) | ९.४८५ | ५०० | २५,००० | ४१०७/- | ३६३६ | १०० |

**ई-लिलाव प्रक्रियेचा तपशील (ब्लॉक H)**

| अ.क्र. | तपशील | पासून | पर्यंत |
|---|---|---|---|
| १ | इ-लिलावात सहभागी होणेसाठी पात्रता मिळवणे | दि.२१/०९/२०२६ स.११.०० | दि.२८/०९/२०२६ सायं. ५.०० पर्यंत |
| २ | ई लिलावात पात्रता ठरविण्यासाठी कार्यालयीन कालावधी | दि.२९/०९/२०२६ स.१०.०० पासून | दि.३०/०९/२०२६सायं. ५.०० पर्यंत |
| ३ | ई लिलावात पात्र झालेनंतर प्रत्यक्ष ई लिलावात बोली बोलणेचा कालावधी खालीलप्रमाणे | दि.०१/१०/२०२६ स.१०.०० ते सायं. ५.०० पर्यंत | |

टीप:- सदर ई लिलाव प्रक्रियेबाबत लिलावधारकांच्या शंका/अडचणी असल्यास कार्यालयीन वेळेत (सोमवार ते शुक्रवार स.१०.०० ते सायं.०६.००) कर विभाग, न.प. घाटंजी यांचेशी संपर्क साधावा. तरी सर्व लिलाव धारकांनी याची नोंद घ्यावी.

| | | |
|---|---|---|
| _____स्वा_____ | _____स्वा_____ | _____स्वा_____ |
| **(परेश शांतीलाल कारिया)** | **(सोनल अंकुश ठाकरे)** | **(राजु एम. घोडके)** |
| **नगराध्यक्ष न.प. घाटंजी** | **उपनगराध्यक्ष न.प. घाटंजी** | **मुख्याधिकारी न.प. घाटंजी** |

---

जा.क्र./नपघा/कावि/गाळेवि/१९९४/२०२६
दि.२९/०९/२०२६

प्रति,

दैनिक:- ..................................

मार्फत:-......................................

वरील जाहिर सूचना आपले वृत्तपत्रात कमीत कमी जागेमध्ये प्रसिद्ध करावे. प्रसिद्ध केलेल्या वृत्तपत्राचे ४ प्रतिसह याचे देयक कार्यालयात सादर करावे.

मुख्याधिकारी
नगर परिषद घाटंजी
जि. यवतमाळ

Scanned with OKEN Scanner

# नगर परिषद कार्यालय,घाटंजी जि.यवतमाळ

## ई-लिलाव अटी व शर्ती

घाटंजी शहरातील स.नं. १, आ.क्र. ९ (आठवडी बाजार परिसर) येथील वैशिष्ट्यपूर्ण योजने अंतर्गत बांधलेले डॉ.बाबासाहेब आंबेडकर व्यापारी संकुल ब्लॉक H मधील एकूण ०२ दुकान गाळे भाडे पट्टीवर हस्तांतरित करणे बाबत ई-लिलाव अटी व शर्ती :-

१) सदर ई-लिलावाची सविस्तर माहिती नगर परिषद कार्यालयात तसेच www.eauction.gov.in या संकेतस्थळावर दि.21./०९./२०२६ पासून उपलब्ध आहे.

२) सदर गाळे लिलावास बोली बोलण्यापूर्वी बोली बोलण्याकरीता अनामत रक्कम रु.२५०००/- ची पावती नगर परिषद कार्यालयात रोखीने रक्कम रू. २५०००/- चा भरणा करावा.

३) ई-लिलावास प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर जी बोली कायम होईल त्यानुसार येणारे वार्षिक भाडे हे अधिमुल्य म्हणून न.प. फंडात जमा करावे लागेल. (उदा. दुकान गाळे भाडे रु.३८००/-, ३८०० x १२ महिने = ४५,६०० रु. अधिमुल्य)

४) **ई-लिलाव प्रक्रीयेमध्ये भाग घेण्याकरिता बोली धारकाकडे दिव्यांगाकरीता आरक्षित असलेल्या गाळ्याकरिता दिव्यांग प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. तसेच भटक्या जमाती प्रवर्गाकरीता आरक्षित असलेल्या गाळ्याकरिता जात प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.**

५) ई-लिलाव भाडे कायम झाल्यानंतर जी मासिक भाडे बोली कायम होईल ती रक्कम प्रती माहे न.प. फंडात जमा करावे लागेल.

६) लिलावात ज्या व्यक्तीला भाग घ्यावयाचा असेल त्या व्यक्तीने दुकान गाळेचे बोलीसाठी ठरलेली बोली अनामत रक्कम या कार्यालयास ठरलेल्या तारखेपर्यंत भरल्याशिवाय लिलावात भाग घेता येणार नाही.

७) ज्या इसमांना लिलावात भाग घ्यावयाचा आहे. त्या इसमांना एकापेक्षा अधिक गाळयासाठी बोली बोलवायची झाल्यास त्यांना बोलीसाठी प्रत्येक गाळयाची ठरलेली बोली अनामत भरणे आवश्यक आहे.

८) नगरपालिकेचे थकबाकीदार असता कामा नये. थकबाकीदार असेल तर लिलावात भाग घेता येणार नाही.

९) बोली बोलणाऱ्यांची लिलाव पट्टी कायम झाल्यानंतर भरलेली अनामत रक्कम अधिमुल्याचे रक्कमेत समाविष्ट करण्यात येईल. उर्वरित अधिमुल्याची रक्कम १५ दिवसाचे आत न.प.फंडात जमा करावी लागेल अन्यथा आपली बोली अनामत रक्कम रु.२५०००/- जप्त करून न.प. फंडात जमा करण्यात येईल व सदर गाळ्याचा फेरलिलाव करण्यात येईल.

१०) मासिक भाडयाव्यतिरिक्त प्रचलित दराने होणारे न.प. व इतर कर नियमानुसार करावे लागेल. तसेच दुकान गाळे भाडयाचे दरात न.प. व इतर करासह प्रतिवर्ष १० % वाढ करण्यात येईल. शासनाचे आदेशानुसार नवीन कर लागू झाल्यास ते आपणाकडून वसूल करण्यात येईल.

११) प्रत्येक दुकानाच्या अनुक्रमांकाप्रमाणे स्वतंत्ररित्या ई-लिलाव करण्यात येईल तसेच प्रत्येक दुकान गाळयाकरीता बोली अनामत रक्कम ही स्वतंत्ररित्या भरावी लागेल.

१२) अनामत व अधिमुल्य रक्कमेवर न.प. कडून कोणतेही व्याज मिळणार नाही, भाडेपट्ट्याची मुदत संपण्यापूर्वी दुकान सोडावयाचे असल्यास सहा महिन्याचे भाडे व कर जमा करून न.प. गाळे सोडण्यास मोकळे राहील. अनामत रक्कमेतून थकीत रक्कम वसूल झाल्यानंतर उर्वरित रक्कम परत करण्यात येईल.

१३) प्रत्येक गाळयासाठी ठरलेल्या मासिक भाडे रक्कमेवर सर्वाधिक बोली बोलणायास गाळा त्यांचे नांवे मंजूर करून दिला जाईल.

Scanned with OKEN Scanner

१४) दुकान गाळ्याचे मासिक भाडे मा. त्रिसदस्य समितीने जे ठरवून दिले आहे. ते आपणास मान्य असेल असे समजण्यात येईल.

१५) सदर गाळे सर्वाधिक बोली मासिक भाडे रक्कमेवर लिलाव पद्धतीने ३ वर्ष मुदतीने भाडयाने घ्यावयाचे आहे.

१६) ज्यांचे नांव लिलावात मंजूर होईल. त्या लिलावधारकांनी बिनव्याजी बोली अनामत म्हणून जी रक्कम भरलेली आहे. त्या रक्कमे व्यतिरिक्त लिलावात बोली होवून मंजूर झालेली वाढीव बिनव्याजी अनामत रक्कम १५ दिवसाच्या आत रोख भरली पाहिजे. जर न भरल्यास सदर बिनव्याजी बोली अनामत जप्त केली जाईल व गाळ्याचा फेर लिलाव केला जाईल. फेर लिलावामध्ये पूर्वीचे बोली मासिक भाडे रक्कमेपेक्षा कमी बोली असल्यास आलेल्या नुकसानीसाठी मूळ लिलाव धारकास जबाबदार ,धरून नुकसान भरपाई मूळ लिलावधारकाकडून वसूल केली जाईल.

१७) सदर लिलावात ज्या इसमांना लिलावामध्ये त्यांचे नांवे गाळे मंजूर झाले नाही अशा इसमांना भरलेली बिनव्याजी बोली अनामतची रक्कम त्यांना बिनव्याजी परत दिली जाईल.

१८) दुकान गाळ्याचे दरमहा भाडयाप्रमाणे वार्षिक भाडयाचा (४० %) हिशोब करून येणाऱ्या वार्षिक भाडयावर प्रचलित दराने होणारे संकलित कर, शिक्षण कर, रोजगार हमी कर, वृक्ष कर, उपयोग कर्ता शुल्क व अग्निशमन कर भरले पाहिजेत.

१९) दुकान गाळ्याचे भाडे व कर एकूण रक्कम ही वर्ष आरंभिस नगर परिषद कार्यालयात आणून भरावयाची आहे.

२०) गाळेधारकास विद्युत मीटर व नळ कनेक्शन स्वखर्चाने घ्यावे लागेल. विद्युत बिल, पाणी पट्टी कर, सदर गाळ्यावरील मालमत्ता कर स्वत: भरावे लागेल.

२१) गाळे धारकाने त्रयस्त व्यक्तीकडे मालकी हक्क असल्याचा दावा मांडून किंवा तो मालकी हक्क स्वत:कडे असल्याचा दावा करीत असल्यास सदर गाळे आपल्याकडून काढून घेण्यात येईल.

२२) दुकान गाळ्याची मुदत संपल्यानंतर सदर दुकान गाळे न.प. च्या ताब्यात न दिल्यास कमीत कमी दुप्पट दराने भाडे आकारण्यात येईल.

ज्यांचे नांवे दुकान गाळे लिलावामध्ये भाडेपट्टीवर कायम होईल त्यांना दुसऱ्याला दुकान परस्पर हस्तांतरित करता येणार नाही. तसेच पोटभाडेकरू ठेवता येणार नाही. अगर गहाण, दान, बक्षीस, गुडविल वा अन्य रीतीने तबदील करता येणार नाही. तसे निदर्शनास आल्यास दुकानाचा ताबा घेण्यास मुख्याधिकारी, न.प. यांचा अधिकार राहील.

२३) नगर परिषदेने नेमलेले सेवक, अधिकारी वर्ग, यांना केव्हाही दुकान तपासणीचा अधिकार राहील.

२४) महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५ चे मालमत्ता हस्तांतरण नियम १९८३ यास अधीन राहून नगर पालिकेने वेळोवेळी मंजूर केलेल्या शर्ती व अटी यास अधीन राहून सदर जागेचा वापर लिलावधारकाने करावयाचा आहे. तसेच नगरपालिकेचे विकास योजने अंतर्गत प्रस्तुत जागेवर दुकान अन्य कोणतेही विकास कामासाठी सदर जागेची नगरपालिकेस आवश्यकता भासल्यास लेखी मिळताच तीस दिवसाचे आत गाळा रिकामा करून दिली पाहिजे.

२५) गाळे धारकास दुकान गाळ्याचा उपयोग अवैद्य धंदे जसे मटका, जुगार अडडे, स्पिरीट, स्पोटक पदार्थ साठविणे व विक्री करणे, अनधिकृत व्यवसाय तसेच खुल्या पद्धतीने मटन/मास/मच्छी विक्री, मिर्ची कांडण यंत्र, गादि कारखाना व ततसम धंद्याकरीता सदर गाळ्याचा वापर करता येणार नाही.

२६) महाराष्ट्र नगरपालिका नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम २८० शेड्यूल ७ खालील कोणत्याही व्यवसायास गाळयामध्ये लायसन्स शिवाय परवानगी देता येणार नाही.

२७) सदर गाळ्याचा वापर निर्यात अगर अन्य कोणताही अनधिकृत व्यवसाय / धंद्यासाठी करता येणार नाही.

२८) दुकान गाळयामध्ये कोणतेही व्यवसाय सुरु करावयाचे झाल्यास नगरपालिकेची वा इतर आवश्यक असणाऱ्या सक्षम अधिकारी यांचे नाहरकत प्रमाणपत्र घेणे हे लिलाव धारकावर बंधनकारक राहील.

Scanned with OKEN Scanner

२९) ई-लिलावाच्यावेळी दुकान गाळयासंबंधी कोणताही वाद निर्माण झाल्यास मुख्याधिकारी यांनी दिलेला निर्णय अंतिम राहील व तो दुकान गाळे धारकास बंधनकारक राहील. संपूर्ण ई-लिलाव प्रक्रिया किंवा कोणत्याही दुकान गाळयाचा लिलाव तहकूब वा रद्द करण्याचा तसेच ई-लिलावाचा कालावधी वाढविण्याचा अधिकार मुख्याधिकारी, न.प. घाटंजी यांनी राखून ठेवलेला आहे.

३०) दुकान गाळयाला विना परवानगी तोडता फोडता, दुरुस्ती करता येणार नाही, जर नगरपालिकेची विनापरवानगी गाळयामध्ये फेरबदल/नासधूस केल्यास होणारे नुकसानीची रक्कम त्यांचे अनामत रक्कमेमधून वसूल केले जाईल.

३१) या व्यतिरिक्त महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ९२ (३), महाराष्ट्र नगरपरिषद (स्थावर मालमत्तेचे हस्तांतरण) नियम-१९९३, स्थायी निर्देश क्र.२४ व शासननिर्णय यामधीलसर्व अटी व शर्ती गाळेधारकास बंधनकारक राहील

३२) तसेच न.प. चे विकास योजने अंतर्गत प्रस्तुत जागेवर दुकान अन्य कोणतेही विकास कामासाठी नगर पालिकेस आवश्यकता भासल्यास आपण लेखी नोटीस मिळताच तीस दिवसाचे आत गाळा रिकामा करून दिला पाहिजे.

३३) दुकान गाळयामध्ये रंगरंगोटी, दुरुस्ती अथवा इतर बदल करावयाचे झाल्यास नगरपालिकेची पूर्व परवानगी शिवाय करता येणार नाही.

३४) दुकान गाळयाची मुदत संपल्यावर सदर गाळयाचे भाडे व कर आणि लाईटबिल याची येणे बाकी नसलेली अनामत रक्कम ही मुदत संपल्यावर बिनव्याजी परत केली जाईल.

३५) मुदत संपताच दुकान गाळा पूर्ववत होता तसाच रिकामी करून नगरपालिकेच्या ताब्यात दिली पाहिजे. तसे न केल्यास अनिधीकाराने (Unauthoritatively) गाळा वापरला म्हणून वार्षिक भाडयाच्या व्यतिरिक्त जादा १०० % दंड म्हणून वसूल केला जाईल व गाळा नगर पालिकेकडून रिकामा करून घेतला जाईल व याकामी येणारा खर्च हा लिलाव धारकाकडून वसूल केला जाईल.

३६) सदर गाळयाची कोणत्याही कारणाने (आग व इतर कोणत्याही कारणाने) नुकसान नैसर्गिक आपत्ती खेरीज झाल्यास किंवा केल्यास होणारे नुकसान भरपाई देण्याची जबाबदारी गाळेधारकावर राहील.

३७) भाडेपट्टा संपण्यापूर्वी नगरपालिकेस व जागेची आवश्यकता भासल्यास अथवा भाडेपट्टाधारकास या जागेची गरज नसल्यास लिलावधारकाने मुदतपूर्व हस्तांतरण केल्यास त्यास चालू सहा माहीचे भाडे व कर भरणे बंधनकारक राहील. याखेरीज लिलावधारकाने वरीलपैकी कोणत्याही अटीचे उल्लंघन केल्यास भाडेपट्टा धारकाचे ताब्यातून जागा कोणत्याही पूर्व सूचना न देता परत घेण्याचा अधिकार नगर पालिकेस राहील. अशा प्रकारची कोणतीही नुकसान भरपाई मागणीचा अधिकार भाडेपट्टा धारकास प्राप्त होणार नाही.

३८) सदर दुकान गाळे / इमारतीची मालकी ही नगरपालिकेची राहील.

३९) लिलावधारकाने नगरपालिकेची परवानगी खेरीज नासधूस अगर गाळयामध्ये फेरबदल करणेचे नाही. तसे केल्यास होणारे नुकसानीची रक्कम त्यांचे डीपॉझिट मधून वसूल केले जाईल.

४०) दुकान गाळयावर असलेली दर्शनी भागावरच दुकानाचे नांव लिहिले पाहिजे त्याकरीता कोणताही बोर्ड वापरनेचा नाही. बोर्ड वापरून शॉपिंग सेंटरची शोभा घालविणेचा प्रयत्न केल्यास पूर्व सूचना न देता बोर्ड जप्त केला जाईल याबाबत अंतिम निर्णय मुख्याधिकारी, न.प. यांचा राहील.

४१) आजूबाजूच्या इतर व्यवसाईकास उपद्रव होईल वा आजूबाजूस जवळपास सार्वजनिक आरोग्यासाठीचे दृष्टिने घाण होईल असे केले जावू नये.

४२) दुकानापुढे फळी, पायरी, शेड, ताडपत्री वगैरे लावून शॉपिंग सेंटरचे सौंदर्य कमी होईल असे कोणतेही कृत्य करू नये तसे केल्यास ते नगरपालिकेकडून काढण्यात येईल त्यामुळे गाळेधारकाचे जे नुकसान झाले त्यास नगरपालिका जबाबदार राहणार नाही.

Scanned with OKEN Scanner

४३) ज्याचे नांवे गाळा मंजूर होईल त्यांनी ई-लिलावानंतर १५ दिवसाच्या आत दुकान गाळे भाडेपट्टीचा करारनामा मुद्रांक पेपरवर करून द्यावा लागेल. निबंधक कार्यालयातून आपणास भाडेपट्टी करारनामा नोंदणीकृत करून द्यावा लागेल. करारनाम्यातील मुदांक शुल्क नोंदणी फी गाळेधारकाकडे राहील. करारनाम्याचा नमुना न.प. कार्यालयातून घेवून त्यानुसार करारनामा तयार करावा लागेल. सदर करारनामा दिलेल्या मुदतीच्या आत न दिल्यास लिलाव रद्द करून करून अनामत रक्कम न.प. फंडात जमा करण्यात येईल व सदर गाळयाचा फेरलिलाव केला जाईल.नगरपरिषदेकडून कळविण्यात आलेल्या तारखेपासून भाडे आकारणी केली जाईल याची नोंद घ्यावी याबाबत कोणतीही तक्रार ऐकली जाणार नाही.

४४) ई-लिलावात मंजूर झालेली गाळयाची बिनव्याजी अनामत रक्कम पूर्ण भरल्याशिवाय गाळा ताब्यात देण्यात येणार नाही.

४५) सदर गाळयाचे भाडे प्रत्येक महिन्याच्या ५ तारखे पर्यंत आगाऊ नगरपरिषद कार्यालयात आणून भरावे विलंब झाल्यास प्रतिमहा २ % इतके व्याज द्यावे लागेल. याबाबत अंतिम निर्णय मुख्याधिकारी, न.प. यांचा राहील.

४६) वरील शर्ती व अटी पैकी एक अगर अनेक शर्तींचा भंग झाल्यास गाळयाचा ताबा मुदतपूर्वीच नगरपालिकेस परत घेण्याचा अधिकार राहील व त्यामुळे नगरपालिकेचे जे नुकसान होईल याची सर्व जबाबदारी गाळेधारकावर राहील.

४७) ई-लिलावासंबंधी इतर आवश्यक माहिती गाळे विभाग, नगर परिषद, घाटंजी यांचेकडे कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल.

४८) सदर ई-लिलावामध्ये गाळे मंजूर अथवा नामंजूर करण्याचे तसेच ई-लिलाव तहकूब करण्याचा अधिकार मुख्याधिकारी, नगर परिषद, घाटंजी यांचे कडे राखून ठेवण्यात आलेला आहे.

मुख्याधिकारी
नगर परिषद, घाटंजी

Scanned with OKEN Scanner